# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.03.2025** **वार : गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- जवाहरलाल नेहरु बंदरापासून चौकपर्यंतच्या सहा पदरी ग्रीन फील्ड महामार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता
- छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित स्थळांना जोडणारी भारत गौरव रेल्वे लवकरच सुरु होणार - रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची लोकसभेत घोषणा
- गुन्ह्याच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आठव्या स्थानी असल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत निवेदन
- नागपूर हिंसाचाराप्रकरणी अटक केलेल्या 51 जणांना उद्यापर्यंत पोलीस कोठडी

आणि

- राज्यात पंढरपूर, तुळजापूरसह अनेक ठिकाणी काल रंगपंचमी पारंपरिक पद्धतीनं साजरी

**मंत्रि मंडळ निर्णय**

नवी मुंबईत जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण जे एन पी एच्या ग्रीनफील्ड महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजूरी दिली. यासाठी साडे चार हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा महामार्ग जेएनपीए बंदराला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मंत्रीमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. भीम-यूपीआयद्वारे छोट्या व्यवहारांना चालना देण्यासाठी केंद्र सरकारनं प्रोत्साहन योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत कमी रकमेच्या प्रत्येक व्यवहारावर 15 शतांश टक्के प्रोत्साहन देण्यात येईल. दोन हजार रुपयांपर्यंतच्या व्यवहारांसाठी हा नियम लागू असेल. या निर्णयामुळे छोटे व्यापारी कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय यूपीआय सेवांचा लाभ घेऊ शकतील असं वैष्णव यांनी सांगितलं. या योजनेसाठी सुमारे दीड हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**लोकसभा**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित स्थळांना जोडणारी भारत गौरव रेल्वे लवकरच सुरु केली जाईल, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले----

**माननीय सांसद महोदया ने बहुत अच्छा प्रश्न रखा है ओर इसके उपर पहालेही काम हुवा है ओर बहुत ही मै संतुष्टी ओर गौरव के साथ केहना चाहुंगा , की छत्रपती शिवाजी महाराज से जुडे सभी क्षेत्रोंको एक बहोत अच्छे भारत गौरव यात्रा से जोडा जायेगा**

देशातल्या अनेक मोठ्या शहरातल्या रेल्वे स्थानकांची क्षमता वाढवण्याचं काम सुरु असून, यामध्ये पुणे आणि हडपसर इथल्या रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण करुन, या स्थानकांवरुन रेल्वे गाड्यांची संख्या वाढवली जाईल, असंही वैष्णव यांनी सांगितलं.

**विधि मंडळ**

केंद्र सरकारच्या प्रस्तावानुसार कोकण रेल्वे महामंडळाचं भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण केलं जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. भविष्यातील प्रकल्पांसाठी तसंच आवश्यक निधीच्या तुटवड्याचं संकट सोडवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. विलिनीकरणानंतर कोकण रेल्वेचं नाव तसंच राहणार असून त्याचं स्वायत्त अस्तित्व कायम ठेवलं जाईल असंही मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात कायदा सुव्यवस्था कायम राखण्यात अनेक आव्हान आहेत. पण त्यासाठी सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करत आहे असं निवेदन मुख्यमंत्र्यांनी काल विधानसभेत दिलं. अर्थ संकल्पातल्या गृह विभागाच्या अनुदानावरील चर्चेला ते उत्तर देत होते. नागपूर हिंसाचार प्रकरणी पोलिसांवर हल्ला करणाऱ्याना अजिबात क्षमा करणार नाही, याचा पुनरुच्चार त्यांनी केला. गुन्ह्याच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आठव्या स्थानी असल्याचं ते म्हणाले -----

**महाराष्ट्र हे कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने देशामध्ये अतिशय चांगलं राज्य मानल जात कायदा आणि सुव्यवस्था असलेलं राज्य मानल जात .ही गोष्ट देखील खरी आहे, की महाराष्ट्रात विविध प्रकारच्या घटना या होत असतात. घटना झाल्यावर त्याला आपण रीस्पोंस कसा देतो , या गोष्टी अधिक महत्वाच्या असतात. देशात सगळ्या गुन्ह्यात महाराष्ट्राचा क्रमांक आठवा आहे,**

केंद्र शासनाने देशात तीन ठिकाणी न्याय वैद्यक विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी एक विद्यापीठ राज्यात नागपुरात उभारण्याचा निर्णय घेण्यात आलेला असंही फडणवीस यांनी सांगितलं. पुणे शहरात शिक्षण आणि रोजगारासाठी येणाऱ्या युवक युवतींच्या कौशल्य विकासात वाढ करण्यासाठी कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधी अंतर्गत कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना 31 मार्चपर्यंत नुकसान भरपाई देणार असल्याचं कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तराप्रसंगी सांगितले. गृह, जलसंपदा, पर्यावरण आणि वातावरणीय बदल, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, पाणी पुरवठा आणि स्वच्छता तसच पर्यटन आणि सांस्कृतिक विभागाच्या अर्थसंकल्पातील मागण्या काल विधानसभेत मंजूर झाल्या. समाजमाध्यमांचा वाढता वापर लक्षात घेता 1979 च्या सेवाशर्थी नियमांमध्ये बदल करून येत्या तीन महिन्यात नवं धोरण आणण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. शासकीय

कर्मचाऱ्यांनी केवळ स्वतःचं उदात्तीकरण  करण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर करू नये, सामान्य लोकांच्या उपयोगासाठी वापर करावा असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.
राज्यातली वीज निर्मिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून टप्प्याटप्प्यानं नवीन प्रकल्प कार्यान्वित होत असून, भविष्यात वीज पुरवठा अधिक सक्षम केला जाईल, असं ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यावरचा विश्वासदर्शक ठराव विधानपरिषदेत काल आवाजी मतदानानं मंजूर झाला. यावर बोलू देण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. मात्र सभापतींनी ती फेटाळून लावल्यावर सभागृहात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. त्यामुळे सभापतींनी कामकाज पंधरा मिनिटांसाठी तहकूब केलं.

**नागपूर हिंसाचार**

नागपूरमध्ये सोमवारी रात्री झालेल्या हिंसाचारात सहभागी असल्याच्या आरोपावरून अटक केलेल्या 51 जणांना न्यायालयानं येत्या उद्या म्हणजे  21 तारखेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान या घटनेतील मुख्य सूत्रधाराला पोलिसांनी अटक केली असल्याचं वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. या घटनेनंतर, अकरा पोलीस स्थानकांतर्गत असलेली संचारबंदी कालही सुरू ठेवण्यात आली होती. परिस्थिति नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या पाच तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. अत्यावश्यक सेवा वगळता पुढील आदेशापर्यंत संचारबंदी लागू राहणार असल्याचं पोलीस उपायुक्त राहूल माखनीकर यांनी सांगितलं आहे. या हिंसाचारात गंभीर जखमी झालेल्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं आहे. राज्यात इतरत्र  कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी  पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे.

**रंगपंचमी**

राज्यात अनेक ठिकाणी काल रंगपंचमी पारंपरिक पद्धतीनं साजरी करण्यात आली. श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिरात महंत आणि पुजाऱ्यांनी देवीला पारंपारिक पद्धतीनं नैसर्गिक कोरडे सप्तरंग लावले. तर पंढरपूरच्या श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरात विठूरायावर केशर-गुलालाची उधळण करण्यात आली. नाशिकमध्ये सात पेशवेकालीन रहाडीमध्ये रंगोत्सव उत्साहात साजरा झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातल्या श्रीक्षेत्र मढी इथं संत कानिफनाथांच्या संजीवन समाधीचं दर्शन घेण्यासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली होती. रंगपंचमीला दरवर्षी इथं गाढवांचा बाजार भरतो. सोलापूरमध्ये पारंपरिक पध्दतीनं रंगगाड्यांच्या मिरवणुका काढण्यात आल्या. सातारा जिल्ह्यात वाईच्या बावधनचं ग्रामदैवत असलेल्या भैरवनाथाच्या बगाडाची मिरवणूक हजारो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. पंढरपूरमध्ये होळीपासून सुरू झालेल्या; उत्पात समाजाच्या बैठकीच्या लावणी महोत्सवाचीही काल सांगता झाली.

**पुणे अपघात**

पुण्याच्या हिंजवडी भागात काल सकाळी एका टेम्पोला लागलेल्या आगीत एका खासगी कंपनीच्या चार कर्मचाऱ्यांचा होरपळून मृत्यू झाला, तर पाचजण जखमी झाले. बसमध्ये एकंदर 15 जण होते. चालकासह पुढे बसलेले कर्मचारी गाडीतून खाली उतरले. मात्र, वाहनाचे मागचे दरवाजे उघडू न शकल्याने त्यातल्या काहींचा होरपळून मृत्यू झाला. या दुर्घटनेतल्या जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**हवामान**

विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय वाढ झाली आहे. राज्यात काल सर्वात जास्त कमाल तापमान ब्रह्मपुरी इथं 41 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्या सकाळ पर्यंतच्या हवामानाच्या अंदाजानुसार विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**